# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि.२४ मार्च २०२५

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी)- नि:पक्ष, वस्तुनिष्ठ व पारदर्शी पत्रकारिता हा लोकशाहीचा गाभा असून विकास पत्रकारितेद्वारा सरकारी योजना जनतेपर्यत पोहचविण्याचे काम पुर्वकाळापासून प्रसारमाध्यमांनी केले आहे. असे प्रतिपादन कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील माध्यमशास्त्र प्रशाळा, विभागीय अधिस्वीकृती समिती,नाशिक व जिल्हा माहिती कार्यालय,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेत “विकास पत्रकारिता : काल, आज, उद्या” या विषयावर आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू प्रा.माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर नाशिक येथील विभागीय माहिती उपसंचालक किरण मोघे, अहिल्यानगर येथील विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष सुधीर लंके, जळगाव येथील जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील, माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.सुधीर भटकर व जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक मिलिंद बुवा हे उपस्थित होते.

प्रा.माहेश्वरी पुढे म्हणाले की पुर्वीच्याकाळी लोकांपर्यंत माहिती पोहचविण्याचे काम वर्तमानपत्रे, रेडीओ, टीव्ही ही साधने करीत होती. आता तंत्रज्ञानात झालेला बदल व सोशल मिडीया या सारखी संसाधने वाढल्याने सरकारच्या योजना सर्वसाधारण जनतेपर्यंत सहज पोहचल्या जात आहेत. प्रसार माध्यमांद्वारे विकास पत्रकारितेचे काम चांगल्या पध्दतीने होत आहे. प्रारंभी डॉ.सूधीर भटकर यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेच्या आयोजना मागील भूमीका सांगितली. उद्घाटनसत्राचे सुत्रसंचालन प्रा.गोपी सोरडे यांनी केले तर आभार डॉ.सोमनाथ वडनेरे यांनी मानले.

उद्घाटनसत्रानंतर श्री.मिलिंद बुवा यांनी “एआय आणि पत्रकारीता” या विषयावर सविस्तर माहिती आपल्या व्याख्यानातून दिली. विभागीय उपसंचालक श्री.किरण मोघे यांनी “पत्रकारांसाठीच्या विविध विकास योजना” या विषयावर माहिती दिली. अधिस्वीकृती पत्रिका-निकष आणि प्रक्रिया या संदर्भात विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुधीर लंके यांनी विवेचन केले. पुढील सत्रात जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी “शासकिय योजना आणि विकास पत्रकारीता” यावर भाष्य केले. त्यानंतर जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी “विकास पत्रकारितेतील स्थित्यंतर” या विषयावर विवेचन केले. समारोप प्रसंगी डॉ. सुधीर भटकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांचा सेवापूर्ती निमित्त कुलगुरू प्रा.माहेश्वरी यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार शिवलाल बारी यांनी कुलगुरुंची तीन वर्षे पुर्ण झाल्याबद्दल सत्कार केला.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी)-युवक कार्यक्रम व खेळ मंत्रालय,भारत सरकार तसेच प्रादेशिक संचालनालय राष्ट्रीय सेवा योजना कक्ष पुणे व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव , नेहरु युवा केंद्र, रासेयो कक्ष यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित जिल्हा स्तरीय विकसित भारत युवा संस्था स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेकरीता १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात स्कुल ऑफ फिजिकल सायन्स प्रशाळेत दिनांक २१ व २२ मार्च २०२५ रोजी जिल्हास्तरीय स्पर्धेत एकूण १२१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यात प्रत्यक्ष ९० विद्यार्थ्यांनी विद्यापीठात येऊन एक देश एक निवडण्क : विकसित भारताबद्दलचे आपले मत परीक्षकांसमोर मांडले. या विद्यार्थ्यांमधून यश पाटील व गायत्री पाटील (नंदुरबार), मोहमद यामीन अलीम शेख व अंजली औतकर (बुलढाण), वृषाली पाटील व घन:श्याम पाटील (धुळे), देवयानी , अक्षया दानी ,शीतल चौधरी , सौरभ माळी (जळगाव) या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड अमोल पाटील, मनिषा खडके, अनिल भोकरे, प्राचार्य प्रमोद पवार, नरेंद्र डागर यांनी काम पाहिले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडलेल्या १० विद्यार्थ्यांची स्पर्धा मुंबई विद्यापीठात २७ मार्च रोजी घेण्यात येणार आहे. अशी माहिती रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी